लोकमत

# माजी विद्यार्थ्यांनी दिला आठवणींना उजाळा

## भुसावळ : नाहाटा महाविद्यालयात आमदार संजय सावकारे यांनी केले अनुभव कथन

लोकमत न्यूज नेटवर्क

**भुसावळ** : येथील भुसावळ कला, विज्ञान आणि पु.ओं.नाहाटा वाणिज्य महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघटनेतर्फे माजी विद्यार्थी मेळावा २०२० उत्साहात झाला. यावेळी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.

अध्यक्षस्थानी ताप्ती एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी विष्णू चौधरी होते. कार्यक्रमाचे उद्‌घाटन माजी विद्यार्थी व आमदार संजय सावकारे यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून माजी विद्यार्थी व ताप्ती एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन महेश फालक तर ताप्ती एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ.मोहन फालक यांची प्रमुख उपस्थिती होती. माजी विद्यार्थी संजयकुमार नाहाटा, भुसावळचे नगराध्यक्ष तथा माजी विद्यार्थी रमण भोळे, संचालक मंडळ शाम दरगड, अनिल भोळे, नीलकंठ भारंबे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मीनाक्षी वायकोळे, उपप्राचार्य डॉ. एस.व्ही.पाटील, डॉ. बी. एच.बऱ्हाटे, डॉ.ए.डी.गोस्वामी, डॉ एन. ई.भंगाळे, प्रा.शैलेश पाटील, पर्यवेक्षक प्रा. यु.बी.नंदाने, प्रा.ई.जी.नेहेते, प्रा.प्रशांत व्ही.पाटील, आशिष चौधरी, प्रा.डॉ.जी.आर. वाणी, प्रा.हर्षल पाटील, प्रा.डॉ.गौरी एम. पाटील, मनोज बियाणी, प्रा. स्मिता बेंडाळे, प्रा.स्वाती शेळके, संतोष विनंते, राजू पारीख, किरण महाजन आदी उपस्थित होते. ७०० माजी विद्यार्थ्यांची सभासद नोंदणी झाली. तसेच ओळख परिचय करण्यात आला. मेळाव्यात सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. त्यात विविध कला प्रकार सादर करण्यात आले. माजी विद्यार्थी व माजी विद्यार्थी संघटनेचे सल्लागार व मेळाव्याचे उद्‌घाटक आमदार संजय सावकारे यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनातील अनुभव उलगडले.

श्याम गोविंदा, भुसावळ



भुसावळ येथील नाहाटा महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी मेळाव्यात उपस्थित माजी विद्यार्थी.